११. 'यो बुद्धेः परतस्तु सः'

वि. वि. जेथे एखाद्या शब्दाच्या अर्थाविषयी वाद उत्पन्न होणे शक्य नाही, असे सामान्यतः वाटते, तेथेहि वाद उत्पन्न झाला असता नवल वाटल्यावाचून राहत नाही. वरील गीतावचनातील ''सः'' या पदाच्या अर्थाविषयी जो वाद उत्पन्न झाला आहे, त्याविषयीही असेच नवल व मौज वाटते.

मी याविषयी आपले मत येथे देत आहे. ''यो बुद्धेः परतस्तु सः'' हा श्लोक गीतेच्या तिसऱ्या अध्यायाच्या शेवटी आला आहे.

संदर्भ ध्यानात घेऊन अर्थ केला पाहिजे

प्रकरणात ''कामा''चा संदर्भ असला, तरी ''काम'' हा ज्ञानाचा प्रबल शत्रू असल्यामुळे, काम जिंकल्याशिवाय ज्ञान स्थिर होत नाही, अशा संदर्भाने ''कामा''चे वर्णन आले आहे. आणि बुद्धीच्या पलीकडे जो आहे, त्याचे ठिकाणीच चित्त स्थिर केले असता ''काम'' जिंकला जातो, हे शेवटी तेथे सांगितले आहे. हे सर्व लक्षात घेऊन ''सः'' या पदाचा काय अर्थ आहे, याचा विचार केला पाहिजे.

आचार्य ज्ञानेश्वरादिक पूर्व संतांनी ''स'' पदाचा परमात्मा असा अर्थ केला असून, कांही आधुनिक लोकांनी त्याचा 'काम' असा अर्थ घेतला आहे. पण,-

हे मुद्दे लक्षात घ्या

(१) ज्या कामाचे ठिकाणी जीवाचे चित्त जडले असल्यामुळे तो त्याचा शत्रु बनला आहे व जो बुद्धीचे कार्य आहे, तो काम बुद्धीच्यापलीकडे आहे व त्या ठिकाणी चित्त स्थिर करावे, असे म्हणणे शक्य नाही.

(२) आता दुसरा 'काम' म्हणजे ''सोऽकामयत अहं बहुस्या प्रजायेय'' या श्रुतीने सांगितलेला जो ईश्वराचा काम, तो येथे 'सः' शब्दाने घेतला पाहिजे, असेही म्हणता येत नाही. कारण,

(अ) परमेश्वराचा ''काम'' जडविनाशी सृष्टिरूप असेल, तर परमेश्वराला जड - विनाशी सृष्टीचा अनुभव असायला पाहिजे. पण, प्रथम अज्ञानी असल्यामुळे पुरुषाला जो जड - विनाशी जगताचा अनुभव येतो, तोच दृढ आत्मज्ञान झाल्यानंतर जर त्याला पुनः कधी येत नाही तर ज्याला कधी अविद्याच नाही व जो नित्यज्ञानी आहे, असे वेदान्तशास्त्र म्हणते, त्या परमेश्वराला जड - विनाशी जगताचा अनुभव

असणाऱ्या त्या जगताच्या उत्पत्तीची त्याने कामना करणे कसे शक्य आहे ?

(आ) सोऽकामयत अहं बहुस्याम् प्रजायेय।

या श्रुतीत नित्य, अविनाशी, सच्चिदानंद स्वरूपाने असणाऱ्या परमेश्वराने मी बहूरूप व्हावे अशी कामना केली, असे म्हटले आहे; पण जड विनाशी जगद्रूपाने बहुरूप होण्यात त्याच्या नित्य, अविनाशी व सच्चिदानंद स्वरूपालाच बाध येत असल्यामुळे तो जड, विनाशी जगद्रूप बहुरूप होऊ शकत नाही.

(इ) वेदान्तात मंदबुद्धीच्या लोकाकरिता सांगितलेल्या सृष्टिदृष्टिवादानुसार जरी परमात्मा अविद्येला आधार आहे व तो सृष्टी उत्पन्न करतो असे म्हटले असले, तरी तेही म्हणणे परमेश्वरावर आरोपितच आहे, वस्तुतः नाही. श्रेष्ठ बुद्धीच्या लोकाकरिता सांगितलेल्या दृष्टिसृष्टिवादात परमात्मा मायारहित शुद्ध परब्रह्मच आहे व जीव अविद्येला आश्रय असून तोच सृष्टीचा संकल्प करतो असे मानले असून,

तो सृजी पाळी संहारी । ऐसे बोलती जे चराचरी ।
ते अज्ञान गा अवधारी । पांडुकुमरा ॥८२॥
आणि साक्षीही होऊं न ठके । येरी गोष्टी कायसी ॥८०॥ (ज्ञा.अ.५)

या ओव्यांनी श्रीज्ञानेश्वरमाउलींनीही परमेश्वराला जड विनाशी सृष्टीचे साक्षात् ज्ञान नाही व तो तिची कामनाही करीत नाही असे म्हटले आहे.

हरिसंकल्प तोही । समूळ मिथ्या ॥ (दासबोध)

असे समर्थांनीहि म्हटले आहे.

(ई) परमात्मा नित्य, अविनाशी, सच्चिदानंद स्वरूप, अद्वैत व अफुट असल्यामुळे त्याने बहुरूप होण्याची कामना केली, तरी त्याच्याहून भिन्न वस्तु नसल्यामुळे तो भिन्न वस्तूची कामना करणेच शक्य नाही. त्याची कामना व बहुरूप होणे या दोंन्ही गोष्टी त्याच्या सच्चिदानंद स्वरूपाहून निराळ्या न राहता तद्रूपच राहू शकतात. आचार्यांनीही,

कथं तर्हि सत्यज्ञानलक्षणाः । स्वात्मभूतत्वाद्विशुद्धाः (तैत्तरीय. उ. २-६)

या पंक्तीत असेच सांगितले आहे.

अर्थात् परमेश्वर व परमेश्वराचा 'काम' हे अफुट एकरूप असताना

भगवन्नाम महिमा,,,